सं.फौ. क्र. ६१२/२०१८
<u>नि. क्र. १७४</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२**
शपथेवर सत्य निवेदन करतो की,

**नाव** – **मैनोद्दीन वाहेद बिरादार**
**वय** – ७२ वर्षे, **व्यवसाय**– शेती,
**राहणार** – मरसांगवी, ता. उदगीर, जि. लातूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी विधिज्ञ श्री. के. टी. उगलमुगले यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

दिनांक ३०/०९/२०१७ रोजी सकाळी १०.०० मी मरसांगवी येथे होतो. त्या दिवशी काय घटना घडली, हे आठवत नाही. आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली, असे काही घडले नाही. आता मला जबाबातील **रेखांकित भाग–अ** वाचून दाखविला. त्याबाबत मला काहीही सांगता येणार नाही.
**(सरकारी वकिलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा कायदा कलम १५४ अन्वये सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी आणि फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पद्धतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.)**

आरोपींना मी ओळखतो. आरोपींसोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञांनी नाकारला.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.04.07 18:06:48 +0530

**( के. ए. यादव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) उदगीर

दिनांक : ०७/०४/२०२६